नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणात स्वयं-सहाय्यता बचत गटांची भूमिका: एक समाजशास्त्रीय अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्यविद्या शाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच. डी. प्राप्त करण्यासाठी प्रस्तूत शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

कैलाश भीमराव पुपलवाड

मार्गदर्शक

डॉ. सुखदेव गोविंदराव चव्हाण

सहाय्यक प्राध्यापक

समाजशास्त्र विभाग

माधवराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय, पालम, जि. परभणी

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्र संकूल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

जुलै, 2024

नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणात स्वयं-सहाय्यता बचत गटांची भूमिका: एक समाजशास्त्रीय अभ्यास

प्रस्तावना:

पुरूषप्रधान भारतीय समाजात महिलांना आपल्या मानवी अधिकारापासून वंचित ठेवण्यात आलेल होते. महिलांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीमुळे समाजात स्त्री-पुरूष विषमता निर्माण झाली होती. मध्ययुगीन काळात महिलांवर अनेक निर्बंध लादले गेले. तसेच वैदिक काळात मनुस्मृतीत पुरूष प्रधान संस्कृतीचा उदोउधो करत महिलांना पारतंत्र्यात ढकलले आणि स्त्रीचे समाजातील स्थानही घसरले होते. १९ व्या शतकात झालेल्या सुधारणावादी चळवळीमुळे महिलांनाही समाजात पुरूषांप्रमाणे अधिकार मिळाले पाहिजे असा विचार सर्वप्रथम पुढे आला. स्त्री ही कुटुंब व समाज विकासात तसेच पर्यायाने देशाच्या विकासात महत्त्वाचा घटक असून पुरूषप्रधान समाजव्यवस्था, धार्मिक कल्पना, सामाजिक रूढी व परंपरा यामुळे स्त्री प्रश्नांकडे दुर्लक्ष झालेले होते.

भारतीय समाजातील स्त्रियांचा दर्जा हा वर्णभेद, जातिभेद, लिंगभेद यानुसार निश्चित होतो. स्त्री कोणत्याही जाती समूहातील असली तरी तिला प्राप्त होणारा दर्जा हा पुरूषांच्या तुलनेत कनिष्ठच असलेला दिसतो. जातीच्या श्रेणी रचनेनुसार प्रत्येक जातीला मिळणारा दर्जा हा वेगवेगळा होता. त्यामुळे कनिष्ठ जातीतील स्त्रियांचा दर्जा हा आणखीच दुय्यम व कनिष्ठ स्वरूपाचा असलेला दिसून येतो. परंतू आदिवासी स्त्रियांचा विचार केल्यास तिच्या पाठीमागे आदिम संस्कृतीचे अधिष्ठान असल्यामुळे आदिवासी महिलांना आदिवासी समाजात मानाचे स्थान होते. (फोले. व भिसे: 2019). गैर-आदिवासी समूहाच्या संपर्कात आल्याने काही कूप्रथा आदिवासी समाजात आल्या व महिलांचा दर्जा खालावलेला दिसतो. आदिवासी समाज सामाजिक, शैक्षणिक, आर्थिकदृष्टीने मागास असल्याने आदिवासी महिलांची स्थितीही दयनीय असलेली दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्याय या मूल्यांवर आधारित राज्यघटना भारताने स्वीकारल्यामुळे सर्वांना विकासाची द्वारे खुली झाली. समता हे तत्त्व स्वीकारल्यामुळे समाजातील दुर्बल घटकाच्या विकासाची जबाबदारी राज्याची मानली गेली त्यादृष्टीने समाजातील इतर दुर्बल व मागास घटकांबरोबरच महिलांच्या सामाजिक-आर्थिक

सक्षमीकरणासाठीही विविध प्रयत्न करण्यात आले. कौटुंबिक स्तरावर गुणवत्ता वाढविण्यासाठी आदिवासी महिलांनी शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक दृष्टीने स्वावलंबी होणे आवश्यक आहे. यातून त्यांच्याकडे बघण्याच्या पारंपरिक दृष्टिकोनात बदल होईल व कौटुंबिक पातळीवर त्यांची गुणवत्ता वाढून आदिवासी महिलांच्या कार्यक्षमतेत वाढ होईल ज्यामुळे देशाचाही विकास होईल. या उद्देशातूनच शासनातर्फे महिलासाठी विविध विकासात्मक व कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यात आले. (सोलंकी, ललिता: 2015) महिलांच्या सामाजिक उत्थानासाठी विविध कायदेही करण्यात आले. त्याचा काही अंशी आदिवासी महिलांना फायदा झाला असला तरीही सामाजिक व राजकीय क्षेत्रातील आदिवासी महिलाचा सहभाग पुरूषांच्या तुलनेत कमीच दिसत आहे.

महिला सक्षमीकरण:-

जागतिक पातळीवर 20 वे शतक महिलांच्या उन्नतीसाठी महत्वाचे ठरले. संयुक्त राष्ट्रसंघाने 1975 हे महिला वर्ष म्हणून तर 1975 ते 1985 हे महिला दशक म्हणून पाळण्यात आले. याच काळात महिला सक्षमीकरण ही संकल्पना उदयास आली. व्हिनेसा ग्रिफून यांच्या मते, महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रिच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची क्षमता, मत प्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, जनसंपर्क, संस्थासंपर्क, आर्थिक व्यवहार इत्यादी करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे होय (मुलानी: 2006). महिला सक्षमीकरण ही एक बहुआयामी संकल्पना आहे. महिलांना सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, वैचारिक पातळ्यांवर समानता प्रदान करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. स्त्री हा स्वतंत्र घटक मानून तिला विकासाच्या प्रक्रियेत पुरूषाच्या बरोबरीचा दर्जा प्रदान करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय.

महिलांचे सबलीकरण ही संकल्पना महिलांच्या विकासाच्या संदर्भात रूढ झाली असून अबला महिलांना सबला करणे आणि त्यांना समान हक्क व संधी देणे हे यामागील तत्व आहे. वंचित महिलांना कोणत्याही भेदभावाशिवाय प्रगती करण्याची समान संधी देणे म्हणजेच महिलांचे सबलीकरण होय. भारत सरकारने 2001 हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून घोषित करून महिलांच्या जीवनातील परिवर्तनाला मोठी चालना दिली आहे. अलीकडच्या काळात सर्वच क्षेत्रात महिला सबलीकरणाचे धोरण राबविले जात असून विविध क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढत आहे (चव्हाण, दिलीप: 2023).

बचत गट- संकल्पना

बचत गट म्हणजे ज्यात प्रामुख्याने समान प्रश्न, सारखे आचार विचार, समान मत आणि परस्पर जवळीक असणारे लोक स्त्री किंवा पुरूष एकत्र येतात व बचतीच्या माध्यमातून आपल्या छोट्या-मोठ्या आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगीण विकास करतात. बचत गट हे महिला सक्षमीकरणाचे महत्वाचे साधन मानले जाते. महंमद युनूस यांना स्वयंसहाय्यता बचत गटाचे जनक असे संबोधले जाते. स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून दारिद्रय निमुर्लन व महिला विकास शक्य आहे हे त्यांनी दाखवून दिले. भारतात इला भट्ट यांचे नाव बचत गट चळवळीशी जोडल्या जाते. बचत गट हे महिलांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय सक्षमीकरणाचे साधन असून विशेषत: ग्रामीण भागातील महिलांचा सर्वांगीण विकास ज्यामुळे शक्य झाला आहे. आदिवासी महिला जी प्रामुख्याने समाजातील सर्वात मागास घटक मानला जातो त्यांना या बचत गट चळवळीचा फायदा झाला किंवा नाही याचे मूल्यमापन करण्याच्या हेतूने सदर संशोधन हाती घेण्यात आले आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा-

आवळे, शिवराज (2013) यांनी 'नांदेड जिल्ह्यातील महिलांच्या सामाजिक-आर्थिक विकासात स्वयंसहाय्यता गटाचे योगदान' या विषयावर पीएच. डी. पदवीसाठीच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास शोध प्रबंध सादर केला होता. महिला स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून झालेला महिलांचा सामाजिक आर्थिक विकासाचा अभ्यास करणे हा सदर संशोधनाचा मुख्य उद्देश होता. प्रस्तूत संशोधन प्राथमिक व द्वितीयक तथ्यांवर आधारित होते. तथ्य संकलनासाठी मुलाखत, मुलाखत अनुसूची या तंत्राचा अवलंब केला गेला तर नमूना निवडीसाठी सहेतूक नमूना निवड पध्दती वापरली होती. स्वयंसहाय्यता गटात सहभागी झाल्यामुळे लाभार्थी महिलांच्या सामाजिक दर्जा, कौटुंबिक दर्जा, त्यांचे राहणीमान, आहार, आरोग्य दर्जा यात सुधारणा झाल्याचे आढळून आले आहे. महिलांना निर्णय स्वातंत्र्य मिळाले असून कुटूंबाच्या महत्वाच्या निर्णय प्रक्रियेत त्या सहभाग घेत असल्याचे प्रस्तूत संशोधनातून निदर्शनास आले आहे. बहुतांश महिलांनी स्वयंसहाय्यता गटामार्फत स्वयंरोजगार सुरू केला ज्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

कावळे, पल्लवी (2022) यांनी 'A Critical Study of Self Help Groups in Nanded District' या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास

व्यवस्थापनशास्त्रात पीएच. डी. पदवी प्राप्त करण्यासाठी शोध प्रबंध सादर केला. बचत गटातील सहभागाद्वारे महिलांचा ग्रामीण विकासातील सहभाग, स्वयंरोजगार व आर्थिक सक्षमीकरणावर काय परिणाम झाला त्याचा अभ्यास सदर संशोधनात केला गेला आहे. बचत गटांच्या कर्जाच्या स्थितीचा अभ्यास करणे तसेच बचत गट व महिलांच्या कुटुंबातील समस्या, स्वयंरोजगार व आर्थिक सक्षमीकरण यांचा सहसंबंध तपासणे हा सदर संशोधनाचा मुख्य उद्देश होता. बचत गटात सहभागी झाल्यामुळे महिलांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्याचे निदर्शनास आले. आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्यामुळे महिलांचे कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेतही सहभाग वाढल्याचे निदर्शनास आले. त्यांचे राजकीय सहभागही वाढला तसेच आत्मसन्मानात वाढ झाली. ग्रामीण भागात महिला बचत गट हे महिला सक्षमीकरणाचे सर्वात् महत्वाचे साधन म्हणून सिध्द होत असल्याचे संशोधनात निदर्शनास आले आहे.

कांबळे, प्रेरणा (2019) यांनी 'पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील उद्योजकतेकडे वळलेल्या महिला स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचा अभ्यास' या विषयावर पीएच. डी. पदवी प्राप्त करण्यासाठी शोध प्रबंध सादर केला होता. बचत गटाच्या माध्यमातून सुरू केलेल्या उद्योगांमुळे महिलांच्या आर्थिक सबलीकरणावर काय परिणाम झाला त्याचा अभ्यास या संशोधनाद्वारे करण्यात आला होता. तथ्य संकलनासाठी प्रश्नावली व मुलाखत तंत्राचा वापर करण्यात आला होता. बारामती तालुक्यातील 50 स्वयंसहाय्यता गट व 500 महिला लाभार्थ्यांची निवड नमून्यात केलेली होती. बचत गटाच्या माध्यमातून महिला स्वयंरोजगार करत आहेत. त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे. महिलांची समाजात तसेच बँकेतही पत वाढली आहे. महिलांचे राहणीमान सुधारले असून मुलांचे शिक्षण, उपभोग व आरोग्य सुधारण्यास मदत झाली असल्याचे संशोधकाला आढळले आहे.

गिरी, निता (2011) यांनी 'अमरावती जिल्ह्यातील महिला बचत गटातील उद्योजकांच्या समस्या आणि त्यांच्या सक्षमीकरणाकरिता संप्रेषण माध्यमांचा उपयोग व परिणामकारकता' या विषयावर पीएच. डी. पदवी प्राप्त करण्यासाठी शोध प्रबंध सादर केला. प्रस्तूत संशोधनासाठी सर्व्हेक्षणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला होता. नमूना निवडीसाठी सहेतूक नमूना निवड पध्दतीचा वापर केला होता. नमून्यात 350 बचत गटांचा समावेश करण्यात आला होता. बचत गटामार्फत सुरू करण्यात आलेल्या उद्योगात महिलांना आर्थिक भांडवलाची कमतरता, मजूरांची समस्या, कच्च्या मालाच्या जास्त

किंमती, औद्योगिक प्रशिक्षणाचा अभाव, उच्च उत्पादन खर्च, उद्योग स्पर्धा, कुटुंबातील सदस्यांच्या सहकार्याचा अभाव अशा अनेक समस्या भेडसावतात असे संशोधकाच्या निदर्शनास आले. या समस्यांच्या निर्मूलनासाठी शासनाकडून अल्प व्याजदरात भांडवल उपलब्ध व्हावे, प्रशिक्षणाची सोय व्हावी, बाजारपेठ उपलब्ध व्हावे अशा सूचना करण्यात आलेल्या आहेत.

पुरंदरे, संगिता (2009) यांनी 'ग्रामीण भागातील विशेषत: शिरूर तालुक्यातील महिला स्वयंसहाय्यता गटांचा विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर पीएच. डी. पदवीसाठी संशोधन केले आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक विकासात महिला स्वयंसहाय्यता गटांची भूमिका अभ्यासणे हा सदर संशोधनाचा मुख्य हेतू होता. प्रस्तूत संशोधनासाठी यादृच्छिक नमूना पध्दतीनुसार 150 महिला बचत गटातील 275 सदस्यांची निवड केली होती. संशोधनाअंती असे निदर्शनास आले की, बहुतांश महिला सभासद नियमितपणे मासिक बचत जमा करीत होते. बहुतांश बचत गटांनी अंतर्गत कर्ज वाटत केले असून अनेकांनी वैयक्तिक व्यवसाय सुरू केले होते. बचत गटामुळे ग्रामीण महिलांचा आर्थिक विकास झाला असून कौटुंबिक संघर्षात घट झाली आहे. बचत गटाचे व्यवहार अधिक पारदर्शक व्हावे, बचत गटासाठी बाजारपेठ व दळणवळणाची सोय व्हावी अशा अनेक सूचना संशोधकाने केल्या आहेत.

येळणे, घनश्याम (2004) यांनी आपल्या 'Women's Empowerment Through Self Help Groups (with Special Reference to Nanded District)' या शोध प्रबंधात नांदेड जिल्ह्यातील बचत गटाद्वारे महिला सक्षमीकरणाचा आढावा घेतला आहे. बचत गटात सहभागी झाल्यामुळे झालेल्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे, निम्न उत्पन्न वर्गातील महिलांमध्ये झालेल्या बचत प्रभावाचे अध्ययन करणे, बचत गटाद्वारे राबविलेल्या जनजागृती कार्यक्रमांचा अभ्यास करणे या हेतूने सदर संशोधन हाती घेण्यात आलेले होते. नमूना निवडीसाठी यादृच्छिक पध्दती वापरण्यात आली होती. बहुतांश महिला आर्थिक बचत करण्यासाठी गटात सहभागी झाल्याचे आढळून आले. तसेच गटात सहभागी झाल्यामुळेच महिलांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल आढळून आला. महिला राजकारणातही सहभागी होऊ लागल्या आहेत. त्यांचा आत्मविश्वास वाढला असून महिला सक्षम झाल्या असल्याचा निष्कर्ष संशोधकाने मांडला. बचत गटांच्या आर्थिक प्रगतीसाठी या

गटांचे नियमीत लेखांकन करणे, गट सदस्यांना प्रशिक्षण देणे तसेच क्षेत्रीय बँकांनी गटाला कर्ज उपलब्ध करून द्यावीत अशा काही शिफारशीही सूचवल्या आहेत.

गायकवाड, शिवाजी (2012) यांनी 'महिला उद्योजकता विकासात स्वयंसहाय्यता बचत गटांची भूमिका (संदर्भ नांदेड जिल्हा)' या विषयावर पीएच. डी. पदवीप्राप्तीसाठी शोध प्रबंध सादर केला होता. स्वयंसहाय्यता गटाद्वारे विकसित महिला उद्योजकांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास प्रस्तूत संशोधनातून करण्यात आलेला आहे. तसेच महिला उद्योजकांना नवीन उद्योग सुरू करण्यात येणाऱ्या अडचणी व आव्हाने यांचाही आढावा घेतलेला आहे. प्रस्तूत संशोधन हे प्राथमिक व द्वितीयक तथ्यांवर आधारित होते. नमूना निवडीसाठी लॉटरी पध्दतीचा वापर केला होता. प्रस्तूत संशोधनातून संशोधकाला असे आढळून आले की, बचत गटांमुळे महिलांचे सक्षमीकरण तर झालेच आहे शिवाय त्यांचे दारिद्रयाचे प्रमाण कमी होऊन राज्यातील पुरूषप्रधान समाजव्यवस्था कमी होऊन स्त्री-पुरूष समानता निर्माण होत आहे.

कुमार, अरबिंद (2022) यांनी 'Women Empowerment Through Self Help Group in Rural Areas of Gandhinagar District of Gujrat' या विषयावर पीएच. डी. पदवी प्राप्तीसाठी शोध प्रबंध सादर केला होता. या शोध प्रबंधात गुजरात मधील गांधीनगरमधील ग्रामीण भागातील महिलांचा बचत गटातील सहभाग व महिला सबलीकरण यांचा सहसंबंध शोधण्यात आला आहे. प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक सांख्यिकी, पिअर्सनचा सहसंबंध पध्दती, रेखीय प्रतिगमन आणि ॲनोव्हा टेस्टचा वापर करण्यात आला. महिलांच्या बचत गटातील सहभागाचा त्यांच्या सामाजिक, आर्थिक, वैयक्तिक व राजकीय सक्षमीकरणावर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले. सामाजिक-आर्थिक सशक्तीकरणाच्या जवळजवळ सर्व पैलूंमध्ये सशक्तीकरणाची उच्च मध्यमान गुणांक आढळला. राजकीय सक्षमीकरण सामाजिक सक्षमीकरणाइतके प्रबळ नव्हते कारण बहुतांश महिला राजकीय निवडणूक लढविण्यास सक्षम नव्हत्या मात्र सामाजिकदृष्ट्या ग्रामीण महिला सक्षम झाल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले.

गुप्ता रचित व अग्रवाल (2017) यांनी आपल्या 'A study on Women Empowerment through Self Help Groups with Special reference to Ghaziabad in Uttar Pradesh District' या शोध निबंधात बचत गटाद्वारे महिला सक्षमीकरणाचा अभ्यास केला आहे. प्रस्तूत संशोधनासाठी संशोधकाने बहुआयामी दृष्टीकोन वापरला असून

बचत गटाद्वारे महिला केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षमच होत नाहीत तर त्यांच्यात आत्मविश्वास येतो, तसेच आपल्या क्षमता व शक्तीचा त्या वापर करू लागतात. रोजगाराच्या बाबतीत बचत गट ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांना रोजगार प्राप्त करण्याचे महत्वाचे साधन मानले गेले आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनात बचत गटाचे महत्व सदर संशोधनातून अधोरेखित करण्यात आले आहे.

एस. रवि व पी. विक्रमन (2012) यांनी आपल्या 'The Growth of Self Help Groups in India: A Study' या शोध निबंधात बचत गट हे ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलनाचे एक साधन म्हणून अभ्यास प्रस्तूत केलेला आहे. भारतातील ग्रामीण तसेच नागरी भागातही स्वयं सहाय्यत गट हे एक महत्वाचे साधन मानले जाते. संशोधकाच्या असे निदर्शनास आले आहे की, बचत गटाच्या माध्यमातून महिला एकत्र येतात व गट स्थापन करून उत्पन्न वृध्दीसाठी नवीन स्त्रोत निर्माण करतात. उत्पन्न वृध्दीसाठी एकमेकांना प्रोत्साहित करतात. ग्रामीण भागात बहुतांश बचत गट हे बाह्य स्त्रोत किंवा धर्मदाय संस्थेकडून कोणतीही मदत न घेता स्वबळावर सुरू करण्यात आलेले आहेत. समाजातील दुर्बल, वंचित व आर्थिकदृष्ट्या मागास घटाकाच्या विकासासाठी बचत गट सहाय्यक ठरले असून बचत गटामुळेच महिलांच्या शोषणातून मुक्तता झाली आहे.

Kaki Sambasivarao (2017) यांनी आपल्या Impact of self-help groups on empowerment of rural women: A case study in Guntur district of Andhra Pradesh या शोध निबंधात आंध्रप्रदेशातील गुटुंर जिल्ह्यातील ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता गटांच्या भूमिकेचा अभ्यास प्रस्तूत केलेला आहे. महिला या जागतिक लोकसंख्येच्या बरोबर अर्ध्या आहेत मात्र त्यांचे नेहमीच पुरूषप्रधान समाजाकडून शोषण झालेले आहे. कुटुंब, समाज, राजकारण व आर्थिक संसाधने याबाबत त्यांचा दर्जा नेहमीच दुय्यम राहिलेला आहे. विशेषत: ग्रामीण महिलांकडे कौशल्ये, शिक्षण, नेतृत्व गुण यांचा अभाव असतो परिणामी त्यांचे पुरूषांवरील अवलंबित्व वाढते. या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी महिला सक्षमीकरण हा सक्षम पर्याय असल्याचे संशोधकाचे मत आहे. महिलांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची गरज आहे. तेव्हाच त्या समाज व देशाच्या विकासात आपले योगदान देऊ शकतील. बचत गटाच्या माध्यमातूनच महिला सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचा निष्कर्ष संशोधकाने काढला आहे.

Muttesha N and Ashwini K P (2019) यांनी आपल्या 'A Study on Women Empowerment through Self Help Groups (An empirical study in Harihara, Davangere district)' या शोध निबंधात बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण कसे होते याचा अभ्यास प्रस्तूत केला आहे. महिलांना सक्षम करण्याचा एक मार्ग म्हणजे बचत गट होय. महिलांच्या विकासावर लक्ष केंद्रित करून विशेषत: ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा एक पर्याय म्हणून उपलब्ध झाला आहे. बचत गटांमुळे महिलांची क्रयशक्ती वाढली असून महिलांना आर्थिक विकासाच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत. महिला देखील देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावत आहेत. बचत गटामुळे दारिद्रयाचे प्रमाण कमी होण्यास व ग्रामीण महिलांचा सर्वांगीण विकास शक्य झाला असल्याचे संशोधनाचे निष्कर्ष आहेत.

प्रस्तूत संशोधनाचे वेगळेपण

संदर्भ साहित्याचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, स्वयंसहाय्यता बचत गट तसेच महिला सक्षमीकरण या आशयाने बरेच संशोधने झालेली आहेत. बचत गटाच्या माध्यमातून सुरू केलेले लघुउद्योग व त्यातून महिलांचे झालेले आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण या आशयाचे संशोधने संशोधकाला आढळली मात्र बचत गटाच्या माध्यमातून आदिवासी महिलांचे सक्षमीकरण हा पैलू दुर्लक्षित असल्याचे संशोधकाच्या निदर्शनास आले त्यामुळेच संशोधकाने सदर संशोधनासाठी या विषयाची निवड केलेली आहे. ज्यात बचत गट व आदिवासी महिला सक्षमीकरण याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

समस्या विधान:-

'नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणात स्वयं-सहाय्यता बचत गटांची भूमिका: एक समाजशास्त्रीय अभ्यास'

संशोधनाचे महत्व:-

आदिवासी समाजातील महिलांचा विचार करता त्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक जीवनपध्दतीत महत्वाची भुमिका वठवितात. परंतु रोजगार, शिक्षण, उत्तम आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकरण यासारख्या जीवनाच्या विविध क्षेत्रात त्या अजूनही मागे आहेत. कुठल्याही समाजाचा विकास करावयाचा असेल तर सर्व प्रथम त्या समाजातील

स्त्रियांचा विकास होणे गरजेचे आहे. कारण कुटूंबातील एका स्त्रिचा जरी विकास झाला तर ती आपल्या संपूर्ण कुटुंबाच्या विकासाचे इतर मार्ग उघडण्यास सुरूवात करते. आदिवासी महिला या आजतागायत जरी विविध क्षेत्रात दिसत असल्या तरी त्यांचे प्रमाण हे अत्यल्प आहे. म्हणूनच आदिवासी विकास दृष्टिकोनाचा विचार करता विषमता, भेदभाव आणि शोषण यावर मात करून महिलांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सक्षमीकरण करून आदिवासी समाजाचा सर्वांगिण विकास साधता येईल.

आदिवासी महिलांचे सक्षमीकरण हे समाजाच्या एकूण प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे. यासाठी स्वयं-सहायता बचत गट एक प्रभावी साधन मानले जाते. भारतातील आदिवासी महिला ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या वंचित राहिल्या आहेत. त्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध सरकारी आणि गैर-सरकारी उपाययोजना केल्या जात आहेत. त्यापैकी एक महत्त्वपूर्ण उपाय म्हणजे स्वयं-सहायता बचत गट. या गटांमुळे महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळवण्याची संधी मिळते, तसेच सामाजिक दृष्ट्या सक्षम होण्याची शक्यता वाढते. या संशोधनात नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाच्या भूमिकेचा अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन उद्दिष्टे:-

1. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. स्वयं-सहायता बचत गटांची संकल्पना, कार्यपद्धती व त्यांचे कार्यक्षेत्र समजून घेणे.
3. आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणात स्वयं-सहायता बचत गटांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
4. स्वयं-सहायता बचत गटांच्या कार्यप्रणालीत असलेल्या अडचणी व समस्यांचा अभ्यास करणे.
5. आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वयं-सहायता बचत गटांना उपयुक्त सूचना करणे.

गृहितकृत्ये:-

1. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिला सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास आहेत.

2. स्वयं-सहायता बचत गट आदिवासी महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणात सकारात्मक योगदान देतात.
3. स्वयं-सहायता बचत गटांमुळे आदिवासी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण झाले असून त्यांची आर्थिक स्वायत्तता वाढली आहे.
4. स्वयं-सहायता बचत गटांच्या संचलनात विविध अडचणी व समस्या येतात ज्याचा बचत गटाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.
5. आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वयं-सहायता बचत गटांना विविध प्रकारच्या आर्थिक, शैक्षणिक, तांत्रिक प्रशिक्षण सहाय्यतेची आवश्यकता आहे.

संशोधन पद्धती:-

प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. प्रस्तूत संशोधनाच्या उद्दिष्टांनुरूप या संशोधन पध्दतीची निवड केली जाणार असून सर्व्हेक्षण पध्दतीचा अवलंब केला जाईल. तसेच सर्व्हेक्षणाद्वारे संकलित माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी सांख्यिकीय पध्दतीचा वापर करण्यात येईल.

नमूना निवड पध्दती:-

प्रस्तूत संशोधनासाठी गैरसंभाव्यता नमूना निवड पध्दती अंतर्गत सहेतूक नमूना निवड पध्दतीचा वापर करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यात एकूण 16 तालूके असून किनवट, हादगाव, भोकर, मुखेड व हिमायतनगर या आदिवासी बहुल तालुक्यांची निवड अभ्यासासाठी करण्यात येईल. या प्रत्येक तालुक्यातून समान प्रमाणशीर प्रतिनिधित्व याप्रमाणे प्रत्येक तालुक्यातून 10 आदिवासी बचत गट याप्रमाणे एकूण 50 आदिवासी महिला बचत गटांची निवड करण्यात येईल. प्रत्येक गटातील 6 आदिवासी महिला याप्रमाणे एकूण 300 महिला लाभार्थ्यांची नमूना निवड सहेतूक पध्दतीने करण्यात येईल.

संशोधनाचे क्षेत्र:-

प्रस्तूत अध्ययनाचे क्षेत्र हे महाराष्ट्र राज्यातील नांदेड जिल्हा आहे. नांदेड जिल्हा हा लोकसंख्येच्या बाबतीत आदिवासी बहुल जिल्हा मानला जातो. 2011 च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या 2,81,695 इतकी असून ती जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या 8.38 टक्के इतकी आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात कमी अधिक

प्रमाणात आदिवासी लोकसंख्या आढळते मात्र सदर संशोधन हे किनवट, हादगाव, भोकर, मुखेड व हिमायतनगर या आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये केले जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती:-

नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणात स्वयं-सहाय्यता बचत गटांच्या भूमिकेचा सखोल अभ्यास करणे हा सदर संशोधनाचा मुख्य हेतू आहे. या अभ्यासाद्वारे आदिवासी महिलांच्या सध्याच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर स्वयं-सहाय्यता बचत गटांची संकल्पना, कार्यपद्धती, आणि कार्यक्षेत्र समजून घेण्यात येईल. स्वयंसहाय्यता बचत गट कशाप्रकारे आदिवासी महिलांच्या आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सामुदायिक सहभाग वाढवतात यावर संशोधन केले जाईल. तसेच, आदिवासी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता बचत गटाच्या योगदानाचा अभ्यास करून त्यांच्यातील आर्थिक साक्षरता, कर्जाची उपलब्धता, आणि उद्योजकीय वृत्ती याचे मूल्यमापन केले जाईल.

या संशोधनाद्वारे स्वयंसहाय्यता बचत गटाच्या कार्यप्रणालीतील अडचणी व समस्यांचा देखील अभ्यास केला जाईल आणि त्यांच्या कार्यक्षमतेत येणाऱ्या आंतरिक व बाह्य अडथळ्यांचा शोध घेतला जाईल. यामध्ये सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय अडथळ्यांचा समावेश असेल. प्रस्तूत संशोधनाद्वारे स्वयंसहाय्यता बचत गटांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी उपयुक्त सूचना दिल्या जातील आणि त्यांना बळकट करण्यासाठी धोरणात्मक उपाय सुचवले जातील. या अभ्यासातून आदिवासी महिलांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी प्रभावी मार्ग उपलब्ध होणार असून नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यात मदत होईल.

संशोधनाची मर्यादा:-

प्रस्तूत संशोधन हे नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमातींपुरते मर्यादित आहे. नांदेड जिल्ह्यातील सर्वच जमाती व तालुक्यांचा या अभ्यासात समावेश नाही. आदिवासी बहुल तालुक्यांची निवड संशोधकाने केली आहे. महिला सक्षमीकरण ही एक व्यापक व बहुआयामी संकल्पना आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, वैचारिक अशा सर्वच पातळ्यांवर महिलांना सक्षम करणे यात अपेक्षित आहे. महिला सक्षमीकरणाचे साधणेही

अनेक आहेत मात्र त्यापैकी बचत गट याचा महिला सक्षमीकरणाचे एक प्रभावी साधन म्हणून अभ्यास केला जाणार आहे. बचत गटाद्वारे आदिवासी महिलांचे झालेले सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाचे मूल्यमापन करणे यापुरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

तथ्य संकलन पध्दती:-

प्रस्तूत अध्ययनासाठी प्राथमिक व द्वितीयक अशा दोन्ही तथ्यांचे संकलन केले जाणार आहे त्यासाठी प्रामुख्याने खालील स्त्रोत व तथ्य संकलन साधणांचा उपयोग केला जाईल.

प्राथमिक तथ्य संकलन:-

मुलाखत अनुसूची- प्रस्तूत संशोधनात स्वयंसहाय्यता बचत गटाद्वारे झालेले आदिवासी महिला सक्षमीकरण याचा अभ्यास करण्यात येणार आहे. तेव्हा बचत गटातील आदिवासी महिला लाभार्थ्याकडून माहिती घेतली जाणार आहे त्यासाठी मुलाखत अनुसूची या साधणाचा वापर करण्यात येईल. कारण बहुतांश महिला उत्तरदाते हे अशिक्षित असण्याची शक्यता असून अशा परिस्थितीत मुलाखत अनुसूची हे तथ्य संकलन साधन उपयोगी सिध्द होते. मुलाखत अनुसूचीचा प्रयोग करत असताना संशोधकाला उत्तरदात्याच्या सामाजिक आर्थिक स्थितीचे निरिक्षणही करणे शक्य होते. त्यामुळेच सदर संशोधनासाठी संशोधकाने मुलाखत अनुसूचीचा अवलंब केलेला आहे.

द्वितीयक तथ्य संकलन:-

प्रस्तूत संशोधनासाठी प्राथमिक माहिती बरोबरच द्वितीयक तथ्यांचा देखील उपयोग केला जाणार आहे. द्वितीयक तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने प्रकाशित व अप्रकाशित संशोधने, वर्तमानतत्रातील लेख, विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय व निमशासकीय अहवाल, आकडेवारी अशा विविध स्त्रोतांचा वापर करण्यात येईल.

तथ्यांवरील प्रक्रिया:-

प्रस्तूत संशोधनातील संकलित प्राथमिक माहितीवर संस्करण केले जाईल. माहितीच्या प्रक्रियेत तथ्यांचे संपादन, वर्गीकरण, सांकेतिकरण या प्रक्रियांचा समावेश होतो.

तथ्यांचे संपादन:- तथ्यांचे संपादन करताना सर्व प्रथम प्रत्येक मुलाखत अनुसूचीची क्रमवार मांडणी केली जाईल. मुलाखत अनुसूचींना क्रमांक देवून त्यांची तपासणी केली जाईल. उत्तरदात्याच्या सर्व नोंदी मुलाखत अनुसूचीत घेण्यात आलेल्या आहेत की नाही ते तपासले जाईल. उत्तरदात्याची उत्तरे विसंगत असल्यास विविध प्रश्नांच्या विसंगतीचे सार पाहून विसंगती दूर केली जाईल व संशोधनाच्या दृष्टीने निरूपयोगी माहिती असल्यास ती वगळण्यात येईल.

1. **तथ्यांचे वर्गीकरण:-** मुलाखत अनुसूचीद्वारे संकलीत विविध प्रकारच्या विस्कळीत माहितीला संघटीत स्वरूप प्रदान करण्यासाठी त्यांना मोजक्या वर्गात विभाजीत केले जाईल. मुलाखत अनुसूचीमध्ये असलेल्या मुक्त प्रश्नांना जी विविध उत्तरे प्राप्त होणार आहे त्यांना समान वैशिष्ट्यांच्या आधारे विविध गटात वर्गीकृत केले जाईल.
2. **सांकेतिकरण:-** तथ्यांच्या वर्गीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्राप्त उत्तरांना संकेत प्रदान केले जातील. तथ्यांना दिलेल्या संकेतांच्या आधारे मुलाखत अनुसूची हाताळण्यात येईल. सांकेतिकरणामुळे गुणात्मक तथ्यांना मापनयोग्य बनवीले जाते. सांकेतिकरणामुळे तथ्यांचे सारणीयन करण्यास मदत होते.
3. **सारणीकरण:-** तथ्यांचे सांकेतिकरण झाल्यानंतर तथ्यांना विविध सारणींमध्ये बसवीले जाईल ज्यामुळे तथ्यांचे विश्लेषण करणे सोपे होईल.

तथ्यांचे विश्लेषण:-

तथ्यांचे विश्लेषण SPSS या संगणीकृत कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रकिया केली जाईल. विश्लेषणासाठी सरासरी, शेकडेवारी, मध्यमान अशा सांख्यिकीय साधणांचा उपयोग केला जाईल.

प्रकरण योजना:- प्रस्तूत संशोधनाची प्रकरण योजना खालील प्रमाणे असणार आहे.

प्रकरण पहिले- प्रस्तावना
प्रकरण दुसरे- संदर्भ साहित्याचा आढावा
प्रकरण तिसरे- संशोधन पध्दती
प्रकरण चौथे- तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
प्रकरण पाचवे- निष्कर्ष व शिफारशी
परिशिष्ट- संदर्भसूची, मुलाखत अनुसूची

संदर्भसूची-

अ) ग्रंथ-

1. आगलावे, प्रदिप. (2000). *'संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे'*. नागपूर: विद्या प्रकाशन
2. आपटे, ज. श. व रोडे, पु. (2008). *'भारतातील महिला विकासाची वाटचाल'*. पुणे: डायमंड पब्लिकेशन.
3. आहुजा, राम. (2006). *'सामाजिक समस्याएँ'*. जयपूर: रावत पब्लिकेशन
4. भांडारकर, पु. ल. (1987). *'सामाजिक संशोधन पध्दती'*. नागपूर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.
5. भिंताडे, वि, रा. (2007). *'शैक्षणिक संशोधन'*. पुणे: नित्यनूतन प्रकाशन
6. काटोले, रविंद्र. (2007). *'महिला बचत गट'*. पुणे: गोडवा कृषी प्रकाशन
7. कुलकर्णी, वि. (2000). *'बचतनामा'*. पुणे: चैतन्य प्रकाशन
8. गोटे-गव्हाणे, शुभांगी. (2004). *'महिला सबलीकरण स्वरूप व समस्या'*. औरंगाबाद: वरद पब्लिकेशन.
9. धारवाडकर, दीपक व भालेराव, साहेबराव (2014). *'सामाजिक नियंत्रण एवं परिवर्तन'*. कानपुर: श्रीराम प्रकाशन.
10. मुलानी, एम. यु. (2006). *'महिला स्वयंसहाय्यता बचत गट'*. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स, पृ. क्र. 58
11. पाटील. अरूंधती. (2012). *'स्त्री: आत्मभान ते सबलीकरण एक प्रवास'*. लातूर: अरूणा प्रकाशन.

ब) पीएच. डी. संशोधने-

1. आवळे, शिवराज. (2013). *'नांदेड जिल्ह्यातील महिलांच्या सामाजिक आर्थिक विकासात स्वयंसहाय्यता गटाचे योगदान'*. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडला अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध. URL- http://hdl.handle.net/10603/242752
2. कांबळे, प्रेरणा. (2019) . *'पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील उद्योजकतेकडे वळलेल्या महिला स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचा अभ्यास'*. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई वाणिज्य

विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करण्यात आलेला प्रबंध. URL- http://hdl.handle.net/10603/284642

3. गिरी, निता. (2011). '*अमरावती जिल्ह्यातील महिला बचत गटातील उद्योजकांच्या समस्या आणि त्यांच्या सक्षमीकरणाकरिता संप्रेषण माध्यमांचा उपयोग व परिणामकारकतां*'. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विषय संप्रेषण क्षेत्रातील पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला शोध प्रबंध. URL- http://hdl.handle.net/10603/308598
4. लामदडे, बालासाहेब. (2016). '*आर्थिक व सामाजिक विकासात महिला स्वयंसहाय्यता बचत गटाचे योगदान पुणे आणि परभणी जिल्ह्याचा तुलनात्मक अभ्यासं*'. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे पीएच. डी. पदवी साठी सादर केलेला शोध प्रबंध. URL- http://hdl.handle.net/10603/206246
5. Kawale Pallavi. (2022). '*A Critical Study of Self Help Groups in Nanded District*'. Thesis submitted For the Award of Degree of Ph. D. in the Subject of Management to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded. URL- http://hdl.handle.net/10603/424306
6. Yelne Ghanshyam S. (2004). '*Women's Empowerment Through Self-Help Groups (With Special Reference to Nanded District)*', Ph.D. Thesis, S.R.T.M. University, Nanded.
7. Kumar Arbind. (2022). '*Women Empowerment Through Self Help Group in Rural Areas of Gandhinagar District of Gujrat*'. Thesis submitted for award of Doctor of Philosophy, to Jagannath University, Jaipur. URL- http://hdl.handle.net/10603/470705

क) मासिके-

1. Gupta, Rachit & Aggarwal, Shalini. (2017). '*A Study on Women Empowerment through Self-Help Groups with special Reference to Ghaziabad in Uttar Pradesh District*'. 32-38.

2. S. Ravi, Dr. P. Vikkraman. (2012). '*The Growth of Self Help Groups in India: A Study*'. Indian Journal of Applied Research. Vol. I, Issue-VII, April, 2012.
3. Kaki, Sambasivarao. (2017). '*Impact of self-help groups on empowerment of rural women: A case study in Guntur district of Andhra Pradesh*'. International Journal of Academic Research. Vol.4, Issue-5(1), May, 2017
4. Muttesha N. and Ashwini K. P. (2019). '*A Study on Women Empowerment through Self Help Groups (An empirical study in Harihara, Davangere district)*'. IOSR Journal of Business and Management (IOSR-JBM). Volume 21, Issue 4. Ser. I (April. 2019), PP 16-31

संशोधक
कैलाश भीमराव पुपलवाड

मार्गदर्शक
डॉ. सुखदेव गोविंदराव चव्हाण
सहाय्यक प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग
माधवराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, पालम, जि. परभणी